# महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग
## राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय
उरो रुग्णालय तिसरा मजला औंध - २७

**उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य पुणे**


संकेतस्थळ : arogya.maharashtra.gov.in
कार्यालय : ०२० — २६०५००२६
नानोप विभाग : ०२० — २६०५८७४७
कायदा विभाग : ०२० — २६०५००२७
इमेल - : crs_d83@yahoo.com


आरोग्य सेवा

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/कायदा विभाग/२०२६/५५/ज. मृ. अभिलेख/ 5077-152 /२०२६
दिनांक:- 29 /04 /२०२६

प्रति,

१) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई.
२) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु (सर्व).
३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, तथा निबंधक जन्म-मृत्यु महानगरपालिका (सर्व).

विषय :- जन्म-मृत्यु नोंदणी नोंदवह्या व इतर अभिलेख

संदर्भ :- १) महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटना यांचे दि. २५/०३/२०२६ रोजीचे पत्र
२) केंद्र शासनाचे जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९.
३) महाराष्ट्र राज्य जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम २०००, नियम १७ कलम ३० (२)(क).

उपरोक्त संदर्भीय विषयी कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ नुसार जन्म मृत्यू व उपजत मृत्यू नोंदणीचे अभिलेख हे कायम जतन व सुरक्षित ठेवणे बंधनकारक आहे. निबंधक यांनी महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १७, कलम ३० (२) (क) अन्वये

१) जन्म, मृत्यु व मृत जन्मच्या (उपजत मृत्यु) नोंदवहया हे कायम स्वरुपी महत्वाचे अभिलेख असतील आणि ते नष्ट करण्यात येऊ नयेत.

२) निबंधकास विलंबित नोंदणीची परवानगी देणारे न्यायालयीन आदेश आणि याबाबतीत विनिर्दिष्ट केलेले प्राधिकारी यांचे कलम १३ अनुसार मिळालेले आदेश हे जन्म नोंदवही, मृत्यु नोंदवही व मृत जन्माच्या (उपजत मृत्यु) नोंदवहीचे अविभाज्य भाग समजले जावेत आणि ते नष्ट करण्यात येऊ नयेत.

३) कलम १० च्या पोट-कलम (३) अनुसार सादर केलेला मृत्यूच्या कारणाचा वैद्यकीय दाखला उपमुख्य निबंधक जन्म मृत्यु, महाराष्ट्र राज्य, पुणे हे किमान ५ वर्षाच्या कालावधीपर्यंत जतन करुन ठेवतील.

४) प्रत्येक नोंदवही आणि वर्ष अखेरीस त्यातील नोंदीसंबंधीचे नमुने ते ज्या कॅलेंडर वर्षाणी संबंधित आहेत, त्यानंतर ६ वर्षांपर्यत जन्माची नोंदवही व १ वर्षापर्यंत मृत्यूची / मृत जन्माची (उपजत मृत्यू) नोंदवही, निबंधक स्वतःच्या ताब्यामध्ये ठेवील आणि त्यानंतर अशा नोंदवहया व नमुने सुरक्षित अभिरक्षेसाठी ग्रामीण भागासाठी गट विकास अधिकारी याचेकडे सुपूर्द करतील. शहरी भागातील संबंधीत निबंधक जन्म मृत्यु हे जन्म मृत्यू व मृत जन्माचे (उपजत मृत्यू) अभिलेख कायमस्वरुपी जतन करण्याची व्यवस्था त्यांचे पातळीवरच करतील

त्याप्रमाणे जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) व महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० अन्वये प्रत्येक जन्म मृत्यू तसेच उपजत मृत्यूची नोंद करणे बंधनकारक आहे तसेच संबंधित सर्व नोंदीची अभिलेखे वरील नियमानुसार जतन करून ठेवावी त्याबाबत आपल्या स्तरावरुन कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

24/4/2026

(डॉ. बी. एस. कमलापूरकर)
उपसंचालक आरोग्य सेवा, (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यू,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सस्नेह सादर :-
उपसंचालक, आरोग्य सेवा,परिमंडळे ............ (सर्व)

प्रत माहितीस्तव सादर :- १) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुबई.
३) मा. सहसचिव, भारत सरकार तथा संचालक, जनगणना कार्यालय, मुंबई
४) मा. संचालक (रुग्णालय), आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई.
५) मा. संचालक, (प्राथमिक), आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म मृत्यू , पुणे.

प्रत :- राज्य कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटना, साईगंगा, लक्ष्मीनारायण नगर, लाडगांव रोड, वैजापूर जि. छ. संभाजीनगर -४२३७०१